


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६८९. वा | शनिवार | दि. २४ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जालिंदर बुधवतांना अपेक्षित तो शेंदूर फासलेला दगड कोण?

## संजय राऊतांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण, नजर कुणावर- निशाणा कुणावर...

## जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांचा रोष नेमका कोणाकडे ?







जनसंचलन/ बुलढाणा

मोताळा तालुक्यात काल पार पडलेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उबाठाच्या जाहीर सभेत शिवसेनेचे वरिष्ठ नेते संजय राऊत यांच्या वक्तव्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. **राऊतांच्या वक्तव्यानुसार आणि उबाठाचे जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांना अपेक्षित शिवसेनेतील तो शेंदूर फासलेला दगड कोण,** असा प्रश्न आता अनेक जण उपस्थित करू लागले आहेत. शिवसेनेत फूट पडल्यानंतर खासदार प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड आमदार संजय रायमूलकर यांच्यासह शिवसेनेचे अनेक दिग्गज पदाधिकारी हे शिंदे गटाकडे पळाले. या पळापळातही काही पदाधिकारी मात्र उद्धव ठाकरे यांच्यावर आपली निष्ठा व्यक्त करून उबाठा गटातच राहिले. सध्या लोकसभा निवडणूक उंबरठ्यावर येऊन ठेपली असल्याने उद्धव ठाकरे हे आपल्या पक्षाची पुनर्बांधणी करण्यासाठी राज्यभरात झंझावाती दौरे आणि सभा करीत आहेत. त्यातीलच एक सभा गुरुवार २२ फेब्रुवारीला चिखली, मोताळा व जळगाव जामोद येथे झाली.मोताळा या सभेत संजय राऊत यांनी केलेल्या एका वक्तव्याची मोठी चर्चा जिल्हाभरात होताना दिसून येत आहे. संजय राऊत यांनी बोलताना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांना कोट करीत म्हणाले की, जालिंदर तुम्ही मघाशी म्हणालात की, बुलढाणा जिल्हा हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी एखादा शेंदूर लावलेला दगड जरी उभा केला तरी जनता त्याला निवडून देईल. या वक्तव्यामुळे कदाचित शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना स्फूरण चढले असेलही, परंतु अशा प्रकारचे वक्तव्य जालिंदर बुधवत यांनी संजय राऊत यांच्याजवळ करून जिल्ह्यातील मतदारांचा एक प्रकारे अपमानच केला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. परंतु हे वाक्य बोलताना जालिंदर बुधवत यांच्या डोक्यात नेमके काय व कोनाविषय होते, हेही तपासणे गरजेचे आहे. गेल्या जवळपास तीन टर्म बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांनी शिवसेनेचे प्रतापराव जाधव यांना खासदार म्हणून निवडून दिले. खासदार जाधव यांनी जिल्हाभरात काहीही विकास कामे केली नसल्याची ओरड सातत्याने होतच असते. प्रतापराव जाधव हे जिल्ह्याच्या काही गावांमध्ये तर गेल्या १५ वर्षांमध्ये एकदाही फिरकले नाहीत, असेही बोलले जाते. परंतु तरीही प्रत्येक वेळी जनतेने त्यांना निवडून देण्याचे औदार्य दाखवले. आता शिवसेनेत फूट पडल्यानंतर प्रतापराव जाधव हे शिंदे गटात असल्यामुळे त्यांचा शिंदे गटाकडून दावा मजबूत आहे, तर दुसरीकडे उद्धव ठाकरे गटाकडून प्रा.नरेंद्र खेडेकर किंवा खुद्द जालिंदर बुधवत यांचा दावा असण्याची शक्यता आहे. परंतु बुधवतांनी जे वक्तव्य राऊतांजवळ केले, त्यामुळे सध्या चर्चेची एक लाट उसळल्याचे दिसून येत आहे. शेंदूर फासलेला तो शिवसेनेचा उमेदवार नेमका कोण, हे मात्र बुधवतांनी स्वतः स्पष्ट करणे गरजेचे आहे. बुधवतांच्या शेंदूर लावलेला दगड, या शब्दाचा रोख हा प्रतापराव जाधव यांच्याकडे आहे की, चिखलीचे नरेंद्र खेडेकर यांच्याकडे याबाबत आता संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. खरे तर शिवसेना उबाठा गटाकडून खुद्द बुधवत हे देखील दबक्या आवाजात दावेदारी करीत आहेत. त्यामुळे शेंदूर फासलेला तो दगड त्यांनी स्वतःला तर संबोधले नसेल, असा खोचक प्रश्न अनेकजण उपस्थित करीत आहेत. बुलढाणा जिल्हा हा गेल्या काही वर्षांमध्ये शिवसेनेचा गड राहिलेला ही बाब खरी आहे. बुधवतांचा हा दावा खरा देखील आहे. परंतु कुणाही दगडाला शेंदूर फासून उभा करा, हे म्हणणे म्हणजे जरा अतिशयोक्ती होईल. कारण गेल्या अनेक वर्षांत बुलढाणा जिल्ह्यात विकासकामे अजिबात झालेली नाहीत. खासदार प्रतापराव जाधव यांचा कार्यकाळ विकासाच्या बाबतीत बुलढाणा जिल्ह्यासाठी फारसा उत्साहवर्धक राहिलेला नाही. त्यामुळे या वेळी प्रतापराव यांच्यासमोर जो कोणी उभा असेल त्याला कठीण आव्हान मिळणार आहे. पर्यायाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला जिल्ह्यात परिचीत तोलामोलाचा व कामे करणारा उमेदवार उभा करावा लागेल. शेंदूर फासलेला दगड उभा करून चालणार नाही. तेंव्हा जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी असल्या कोणत्याही भ्रमात राहू नये. बुलढाणा जिल्ह्यातील जनता अत्यंत सुजाण आहे. ती योग्य त्या व्यक्तीलाच निवडून देईल. तेंव्हा बुधवतांनी फुकटच्या अविर्भावात जाऊ नये व जिल्ह्यातील जनतेला अजिबात गृहित धरू नये, एव्हीढीच त्यांच्याकडून अपेक्षा.

## पहिले तोला नंतरच उमेदवारीच बोला...

**येणाऱ्या २०२४ लोकसभेत खासदारकी साठी काही हवेसे नवसे गवसे उमेदवारी मिळावी करिता वर्षोनवर्षं लोकसभा मतदार संघात मिस्टर इंडिया झालेले आता खासदारकीची स्वप्न रंगवू राहिले असो पक्ष प्रमुखांनी लोकसभा उमेदवारी देतांना त्या उमेदवाराचा जिल्ह्यात काय योगदान आहे त्यांनी आता पर्यंत जिल्ह्यातील विविध समस्या व संकटात त्रस्त असलेल्या जनतेसाठी कोणकोणते आंदोलने शासकीय अधिकाऱ्याकडे कागदोपत्री पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून दिला पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे परिवारावर आरोप प्रत्यारोपात जिल्ह्यातून कोणी सडेतोड उत्तरे दिली त्यावेळेस कोण कोण भूमिगत झाली हे सर्व अगोदर तपासणे गरजेचे असल्याचे संपूर्ण जिल्ह्याच्या नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे**

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भाजपा ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे जिल्हा संयोजक पदी दत्ता पाटील यांची निवड...



**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यालय मुंबई येथे झालेल्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या महाराष्ट्र राज्याच्या बैठकीमध्ये प्रदेशाध्यक्ष माननीय गणेश काका जगताप यांनी दत्ता पाटील यांची बुलढाणा जिल्हा ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या जिल्हा संयोजक पदी निवड करण्यात आली. यावेळी प्रदेश सहसंयोजक माननीय समाधान जी गायकवाड प्रदेश सहसंयोजक माननीय उमाताई तायडे अमरावती विभाग संयोजक कौस्तुभ पाटील वैशालीताई नागरे माननीय बंडूभाऊ पाटील जळगाव जामोद या मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले.

पक्षकार्याचा दांडगा अनुभव जिल्हाभर असलेला संपर्क पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हाभर केलेले कार्य. आसाम राज्याच्या विधानसभा निवडणुकीत २००६ मध्ये माननीय स्व प्रमोद जी महाजन यांनी विधानसभा निवडणूक निरीक्षक म्हणून दिलेली जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडली. मागील वर्षी मध्य प्रदेशामध्ये खंडवा जिल्ह्यातील हरसुद विधानसभा मतदारसंघांमध्ये विस्तारक म्हणून बूथ मजबुतीकरणाचे काम केले. जिल्ह्यामध्ये जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष बुलढाणा तालुका अध्यक्ष जिल्हा प्रसिद्धीप्रमुख जिल्हाचिटणीस जिल्हा उपाध्यक्ष अशा विविध पदावर केलेल्या कामाचा अनुभव लक्षात घेऊन तसेच जनतेसाठी प्रश्न सोडविण्यासाठी केलेली विविध गाजलेली आंदोलने सर्व निवडणुकीतील उमेदवारांचा सक्रियपणे केलेला प्रचार यामुळे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी श्री दत्ता पाटील यांच्यावर देण्यात आली.

याप्रसंगी माननीय प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी सर्व नव नियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

देशाच्या राज्यव्यवस्थेमध्ये पंचायत राज व्यवस्था ही अत्यंत महत्त्वाची व्यवस्था आहे घटनेने जी लोकशाही चौकट आखून दिली त्यामध्ये जनतेच्या हाती स्थानिक सत्ता सूत्र असले पाहिजे व स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी निवडून आपल्या भागातील कामे समस्या सुविधा प्राप्त करून घेण्याचा अधिकार या माध्यमातून जनतेला देण्यात आला आहे.

ग्रामपंचायती पंचायत समित्या नगरपालिका जिल्हा परिषदा ह्या या विभागाअंतर्गत येतात त्यांना प्राप्त होणारा केंद्र राज्य सरकारचा निधी योग्य वापर नागरिकांना येणाऱ्या समस्या त्याची सोडवणूक करणे केंद्र राज्य सरकारच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे यावर देखरेख ठेवून प्रशासनाशी समन्वय ठेवून काम करणे या विभागांतर्गत अपेक्षित आहे.

जिल्हाभरात राज्य व केंद्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाचा कामाचा वेळोवेळी अहवाल देण्याची जबाबदारी सुद्धा यावेळी देण्यात आली.

# अखेर उपविभागीय अधिकारी राजेंद्र जोगी यांच्या मध्यस्थीने पारधी समाज बांधवांचे उपोषण मागे...



**जनसंचलन/ लोणार**

२० फेब्रुवारी २०२४ रोजी तालुक्यातील शारा, सावरगाव मुंढे, गंधारी, खुरमपूर, किन्ही, गुंधा, आरडव, बीबी, पार्डा दराडे, कुंडलस,पांग्रा डोळे, सुलतानपूर, वढव, उदनापूर या गावातील फासे पारधी कुंटूबातील महिला पुरुष हे आपल्या न्यायिक मागण्यांसाठी लोणार तहसिल कार्यालयासमोर उपोषणास प्रारंभ केला होता. यावेळी शेषराव पवार,नाना पवार, ऋषीकपूर पवार, विशाल पवार, सुधीर पवार, हारिष चव्हाण, राजू पवार, अनिल पवार, सुभाष शिंदे, कोहिनूर शिंदे, दगडू भोसले, भीमा भोसले, राजेंद्र शिंदे, विठ्ठल पवार, बन्शी पवार, संजय पवार, देवदास भोसले,राजू पवार,लैला पवार, मंदा पवार, कल्पना पवार, शारदा पवार, गीता पवार, पंचफुला भोसले, रेखा पवार, वर्षा पवार,संगीता पवार हे उपोषणकर्ते आपल्या मागण्यांवर ठाम होते. दरम्यान प्रशासन वेळोवेळी उपोषण सोडविण्यासाठी गेले असता उपोषणकर्त्यांनी कुठलाच प्रतिसाद दिला नाही. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्याचे सांगितले. त्या अनुषंगाने लोणार तहसीलदार गिरीष जोशी यांनी हि बाब जिल्हाधिकारी यांना सांगितली. जिल्हाधिकारी यांनी नव्यानेच रुजू झालेले मेहकर उपविभागीय अधिकारी राजेंद्र जोगी यांना लोणार येथील उपोषणकर्त्यांसोबत चर्चा करण्यासाठी दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी पाठविले. उपविभागीय अधिकारी राजेंद्र जोगी यांनी प्रशासकीय सेवेदरम्याण धारणी, मेळघाट येथील आदिवासी बांधव, पारधी समाजाचे अनेक प्रलंबित प्रश्न सोडविले होते. त्या आपल्या सेवेदरम्यानचा अनुभव व कौशल्य वापरत उपविभागीय अधिकारी राजेंद्र जोगी यांनी उपोषणकर्त्यांना शासनाच्या व एकात्मिक आदिवासी प्रकल्पाच्या योजना सविस्तरपणे समजावून सांगितल्या. तसेच पारधी समाज बांधवाना येणाऱ्या अडीअडचणी समजून घेत त्यांना शिधापत्रिका व अंत्योदय योजनेमधील लाभ देण्यासाठी महसूल प्रशासन तत्पर असल्याचे सांगितले. त्याच बरोबर घरकुलाचा प्रश्न गटविकास अधिकारी पंचायत समिती अंतर्गत सोडविण्याचे हि मान्य केले. त्याच बरोबर पारधी समाज बांधवाचा शैक्षणिक बाबीसाठी असणारे जातीचे दाखले तात्काळ विशेष मोहीम राबवत देण्याचे निर्देश महसूल प्रशासनाला दिले. प्रामुख्याने मागणी असणारे शासनाच्या ई क्लास जमिनीबाबतच्या मागण्या शासन दरबारी मांडत याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येतील व त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल, असे सुद्धा उपोषणकर्त्यांना सांगत त्यांना थंडपेय देत उपोषण सोडविले. यावेळी मेहकर उपविभागीय अधिकारी राजेंद्र जोगी, लोणार तहसीलदार गिरीष जोशी, नायब तहसीलदार रामप्रसाद डोळे, योगेश्वरी परळीकर, लोणार पो.स्टे. चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक निमिष मेहेत्रे, मेहकर उपविभागीय कार्यालयाचे कैलास मुरकुट, मंडळ अधिकारी लक्ष्मणराव सानप, तलाठी अशोक सौदर, सचिन शेवाळे, लोणार पो.स्टे.चे लेखानिक गणेश लोढे, विशाल धोंडगे, गोपनीय विभागाचे संतोष चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष संदीप मापारी पाटील, महसूलचे प्रस्तुतकार १ पुरुषोत्तम आघाव, किशोर मादनकर यांचेसह महसूल व पोलिस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते.

# संग्रामपुर येथील वन बुलडाणा मिशनच्या महिला मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद...

## महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबध्द : संदीप शेळके

**जनसंचलन/ संग्रामपूर**

वन बुलढाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा २२ फेब्रुवारी २०२४ ला संग्रामपूर तालुक्यात दाखल झाली. महिला मेळावा व बाईक रॅली काढत संग्रामपूर तालुक्यातील ७० गावातून जाणार असुन यात्रा पुढे मार्गस्थ झाली आहे. मागील १२ दिवसात यात्रेने मोताळा, शेगाव तालुका पिंजून काढला. संग्रामपूर येथे झालेल्या महिला मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रतिसादासह गाजलेल्या या मेळाव्यात महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी आपण कटिबध्द असल्याचे वचन संदीप शेळके यांनी दिले.

महिलांच्या अनेक समस्या तर आहेच पण सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर आहे. जिल्ह्यात बेपत्ता महिलांचे सर्वाधिक प्रमाण आहे, दिवसाला विवाहित महिला, अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याच्या घटना आपण ऐकून आहोत .आर्थिक व कुटुंब विवंचनेत असलेल्या महिलांसाठी आधार बनणे सध्या गरजेचे आहे, त्यांच्या आर्थिक अडचणी दूर केल्या तर नक्कीच विपरीत घडणाऱ्या घटनांना आळा बसू शकतो.




आर्थिक दृष्ट्या महिलांना मजबूत करण्यासाठी ग्रामीण भागात बचतगटांची व्याप्ती वाढविणे गरजेचे आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या तरुणींसाठी स्वतंत्र अभ्यासिका असली पाहिजे, गाव खेड्यात स्वच्छतागृह बांधली पाहिजे, महिलांच्या निरोगी आरोग्यासाठी आरोग्य विभागाचे समुपदेशन केंद्र असले पाहिजे, या सर्व समस्या दुर करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत असे शेळके म्हणाले. जिल्ह्याच्या विकासात मातृशक्तीची भागीदारी वाढवणार असल्याचेही ते म्हणाले. दरम्यान वन बुलढाणा मिशनचे वतीने संग्रामपूर ते सोनाळा अशी बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने युवक सहभागी झाले होते. तसेच सोनाळा येथे संत्रा प्रक्रिया केंद्र सुरू झाले पाहिजे, प्रत्येक तालुक्यात एमआयडीसी झाली पाहिजे, सोयाबीन कापसाला भाव कधी मिळणार? अशा आशयाचे फलक लक्ष वेधून घेत होते.

# दुचाकी घसरून खळेगाव येथील एकाचा मृत्यू

**जनसंचलन/ कारेगाव**

खळेगाव येथे काम आटोपून परत जात असलेल्या एका ३२ वर्षीय युवकाचा दुचाकी घसरून झालेल्या अपघातामध्ये मृत्यू झाला. ही घटना २१ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास कारेगावनजीक घडली. प्रवीण प्रकाश सहारे (३२) असे या अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. कारेगाव येथे कामानिमित्त ते गेले होते. परत येत असताना गतिरोधकावर त्यांचा वाहनावरील ताबा सुटून दुचाकी रस्त्यालगत केलेल्या खोदकामात घासत केली. त्यात प्रवीण सहारे यांच्या




डोक्याला जबर मार लागला. दरम्यान, रात्री प्रवीण सहारे घरी न आल्यामुळे त्याच्या कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला. परंतु, तो सापडला नाही- दरम्यान, सकाळी सैन्यभरतीची तयारी करणाऱ्या मुलांना अपघातग्रस्त अवस्थेत तो दिसला. मेहकर ग्रामीण रुग्णालयात त्यास नेले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# निर्मिती क्षेत्रांतील प्रत्येक कारागीर विश्वकर्मा या व्यापक संकल्पनेतून विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी

## उदयोजक घडविण्यासाठी जिल्हा उदयोग केंद्राची मदत - महाव्यवस्थापक सुनिल पाटील







**जनसंचलन/ चिखली**

उदयोग उभारण्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याचे काम जिल्हा उदयोग केंद्र करते. व्यक्तीला उदयोग उभारून आर्थिक प्रगती साधता यावी यासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना आहे. जिल्हा उदयोग कार्यालयात क्यूआर कोडच्या माध्यमातून योजनाची माहिति प्राप्त होते. आर्थिक उन्नतीसाठी उदयोगाची कास धरा. उदयोजक घडविण्यासाठी जिल्हा उदयोग केंद्राची मदत होते असे विचार बुलडाणा जिल्हा उदयोग केंद्राचे महाव्यवस्थापक सुनिल पाटील यांनी बुधवारी ता. २१ रोजी बोलतांना व्यक्त केले. चिखली येथील संत खटकेश्वर महाराज संस्थान येथे चिखली तालुका उत्सव समितीने आयोजित प्रभू विश्वकर्मा जयंती प्रसंगी मार्गदर्शन प्रसंगी ते बोलत होते. जेष्ट कामगार नेते सतिष शिंदे यांच्या संकल्पनेतून निर्मिती क्षेत्रांत काम करणारा प्रत्येक कारागीर म्हणजेच विश्वकर्मा या व्यापक संकल्पनेतून विश्वकर्मा जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विविध क्षेत्रातील कारागीरांना त्यांच्या कार्याबद्दल विश्वकर्मा पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या देण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अत्रिनंदन सिमेंट प्रोडक्टचे संचालक विजयकुमार मेहत्रे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून बुलडाणाचे जिल्हा उद्योग केंद्राचे सुनील पाटील तर प्रमुख पाहूणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष संजय गाडेकर, गाव माझाचे संपादक पवन वानखेडे, पत्रकार सुधीर चेक, जेष्ठ कामगार नेते सतीष शिंदे, ॲड वृषाली ताई बोंद्रे, गाव माझा च्या महिला प्रमुख अष्टगाथा मॅडम, बचत गटाच्या सीमा मॅडम, मेघा जाधव, मार्गदर्शक,श्रीराम वानखडे, गजानन जवरकर, उत्सव समिती संतोष जगताप, बंडू कदम, राहुल इंगळे, समाधान, भोलवनकर तथा आदि उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात प्रभू विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलनाने झाली. सकाळी प्रभू विश्वकर्मा यांचे विधीवत मंत्रोच्चारात पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित सुतार समाज बांधवांनी मोटरसायकल रॅली काढण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल इंगळे गणेश मुर्हेकर ,विजय कुठे, दिगंबर दुतोंडे, गोपाल खोलगडे, विजय जाधव, समाधान भोलवनकर, उमेश मिस्त्री, गुलाब मिस्त्री राहुल शिंदे, विजय सांगळे, भागवत तांगडे, राम काळे, गजानन खवसे, गजानन सुरोशे यांनी अथक परिश्रम घेत-ले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कामगार नेते सतिष शिंदे तर सूत्रसंचालन अनंत राऊत यांनी तर आभार प्रदर्शन पत्रकार संतोष थोरहाते यांनी मानले.

विश्वकर्मा जयंतीतून सामाजिक ऐक्याचा संदेश

चिखली येथे विविध क्षेत्रातील कारागीर एकत्रित येत विश्वकर्मा जयंती साजरी करून सामाजिक ऐकतेचा संदेश दिली. आपण सर्व एक आहोत या व्यापक संकल्पनेला मुर्तरूप दिले. विश्वकर्मा म्हणजे निर्मिती करणारा प्रत्येक कारागीर होय. असेही जेष्ठ कारागीर नेते सतिष शिंदे यांनी बोलतांना सांगितले.

# अवैध व्यवसाय तत्काळ बंद करण्याची मागणी ग्रामस्थांचे पोलिस प्रशासनाला निवेदन....




**जनसंचलन/मलकापूर पांग्रा**

साखरखेर्डा पोलिस ठाण्यांतर्गत येत असलेल्या मलकापूर पांग्रा येथील अवैध व्यवसाय बंद करण्याची मागणी माजी सरपंच साबेर पठाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे. दोन दिवसांपूर्वी सामाजिक कार्यकर्ते शेख सत्तार शेख नवाज, उपसरपंच भगवानराव उगले यांनीही केली होती. त्यामुळे गाव परिसरातील अवैध व्यवसाय बंद करण्याचा ग्रामस्थांचा सूर आता वाढत आहे. गावातील मुख्य रस्त्यावरच वरली मटक्याची दुकाने थाटली गेली आ-हेत. यामध्ये तरुण मुले गुरफटली जात आहेत. शाळा महाविद्यालयाच्या लगत मद्य मिळत आहे. याकडे साखरखेर्डा पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजप कोअर कमेटीचे सदस्य तथा मलकापूर पांग्राचे माजी सरपंच साबेर पठाण यांनी ही मागणी केली असून जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासणे यांनाही याबाबत निवेदन देण्यात आले आहे. तरीद-खील अवैध धंद्यांविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. यामुळे परिसरातील हे अवैध व्यवसाय बंद न झाल्यास १ मार्चपासून आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे.

# सासूने बॅटने मारहाण केल्याने जावयाचा मृत्यू

**जनसंचलन/ खामगाव**

माहेरी असलेल्या पत्नीच्या घरी जाऊन शिवीगाळ करणे, तसेच सासू व पत्नी दरवाजा उघडत नसल्याने जावयाने दारावर दगडाने हल्ला सुरू केला. यावेळी संतप्त सासूने मागच्या दारातून येत जावयाच्या डोळ्यात मिरची पूड फेकत बॅटने केलेल्या बेदम मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याची घटना शेगाव तालुक्यातील जवळा बु. येथे गुरुवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी मृतकाच्या पत्नीच्या तक्रारीवरून सासूविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेगावातील रहिवासी दीपक हाडोळे याला मद्यपानाचे व्यसन होते. त्याच्या व्यसनाला कंटाळून पत्नी वैष्णवी ही -४-५ वर्षांपासून जवळा बु. येथे आई सशीला अवधत (बाप) काळे हीचे सोबत राहत होती. २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी दीपक हाडोळे हा मद्यपान करून जवळा बु, येथे आला. तसेच, सासूच्या घरासमोर शिवीगाळ करीत होता. घराच्या दरवाजावर लाथा व दगड मारून उघडण्याचा प्रयत्न करीत होता. सासू किंवा पत्नी दरवाजा उघडत नसल्यामुळे मोठमोठे दगड दारावर मारत होता. त्यामुळे सासू सुशीला काळे ही घराच्या मागील दरवाजातून बाहेर आली. दीपक हाडोळे याच्या डोळ्यात मिरची पावडर फेकली. तसेच, बाजूला पडलेल्या लाकडी बॅटने त्याला बेदम मारहाण केली. मारहाणीत त्याचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी मृतकाची पत्नी वैष्णवी दीपक हाडोळे हिने शेगाव ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला

# माणुसकी सोशल फाउंडेशनचा राष्ट्रीय माणुसकी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ - सचिन खंडारे यांना जाहीर

**जनसंचलन/बुलडाणा**

माणुसकी सोशल फाउंडेशन नाशिकचा राष्ट्रीय माणुसकी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ सिंदखेडराजा तालुक्यातील शिंदी येथील धडाडीचे युवा पत्रकार सचिन खंडारे यांना जाहीर झाला आहे सचिन खंडारे हे महाविद्यालय जीवनाप-ासून पत्रकारिता करत आहेत गेल्या १४ वर्षापासून विविध वर्तमानपत्रांमध्ये त्यांनी काम केले आहे ,शिवाय कथा, ललित लेख , कविता, असे विविध साहित्य सुद्धा त्यांचे अनेक वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झाली आहेत . त्यांनी दैनिक देशोन्नती, दिव्य मराठी .पुण्यनगरी, दै . महासागर , दै . भारत संग्राम , दै . सायरन . दै . सत्ता शासन , दै . बेधडक .इत्यादी दैनिकामध्ये काम केले आहे . शेतकरी कष्टकरी , ग्रामीण भागातील समस्यांना वाचा फोडण्याचे व न्याय देण्याचे काम त्यांनी केले आहे , पत्रकारीतेच्या माध्यमातून त्यांनी गावातील पाणीसमस्या .शेतरस्ते, डांबरीकरणाचे रस्ते, अतिवृष्टीची नुसकान भरपाई इत्यादी समस्याचे निराकरण केले आहे . तसेच विविध सामाजिक कार्यामध्ये सुद्धा ते अग्रेसर असतात वृक्षारोपन , गरिबांना मदत करणे, रक्तदान शिबीराचे आयोजन , विविध उपक्रम ते राबवित असतात .याच कार्याची दखल घेऊन माणुसकी सोशल फाउंडेशन नाशिक द्वारा आयोजित ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यामध्ये त्यांना राष्ट्रीय माणुसकी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ जाहीर झाला आहे . माणुसकी सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष तथा ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब केदारे तसेच राष्ट्रीय सचिव अविनाश झोटिंग यांनी सदर पुरस्काराची घोषणा केली आहे . येत्या २६ फ्रेबुवारीला नाशिक येथे होणाऱ्या ग्राहक उपयुक्त संरक्षण समितीच्या वर्धापन दिन कार्यक्रमांमध्ये माजी न्यायधीश अशोक आव्हाड . जिल्हा



ग्राहक तक्रार निवारण आयोग अध्यक्षा सौ . मंदाकिनी भोसले . कैलास पवार जिल्हा पुरवठा अधिकारी नाशिक मोहन आडागळे , मा . पुरवठा अधिकारी निफाडकर सकाळची मा संपादक उत्तम कांबळे .आमदार एडवोकेट राहुल ढिकले .संदीप कर्णिक नाशिक पोलीस आयुक्त . मोनिका राऊत पोलीस उपायुक्त नाशिक .प्रशांत बच्छाव पोलीस उपायुक्त नाशिक . एल . सोनवणे शिक्षण उपसंचालक नाशिक यांच्यासह दिग्गज मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे



# मविआतील जागावाटपाचा तिढा सुटेना, उद्धव ठाकरे आणि राहुल गांधींमध्ये चर्चा...




**वृत्तसंस्था/मुंबई**

आगामी लोकसभा निवडणुकांचे जागावाटप अंतिम करण्यापूर्वी शुक्रवारी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी फोनवरून चर्चा केल्याची माहिती पुढे आली आहे. महाविकास आघाडीतील काही जागावाटपावर एकमत होत नसल्याने या दोन्ही नेत्यांनी चर्चा केल्याची माहिती सूत्रांनी दिली. राहुल गांधी यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्याशी फोनवरून चर्चा केल्याचे कळते.राहुल गांधी यांनी या दोन्ही नेत्यांशी फोनवरून जागावाटपाबाबत सविस्तर चर्चा केली. या चर्चेतून आठ जागांचा तिढा सुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये महाविकास आघाडीच्या जागावाटपाचे सूत्र निश्चित होईल, अशी चर्चा आहे. येत्या २७ आणि २८ तारखेला लोकसभा जागावाटप संदर्भात महाविकास आघाडीची बैठक होणार आहे. या बैठकीत जागावाटपाच्या फॉर्म्युलावर शिक्कामोर्तब होईल, असा विश्वास आघाडीच्या नेत्यांकडून व्यक्त करण्यात आला. याशिवाय, वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत कशाप्रकारे सामावून घ्यायचे, याबाबतही उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी यांच्याच चर्चा झाली असण्याची शक्यता आहे.

# तरुणीवर अत्याचारप्रकरणी आरोपीला अटक...



**जनसंचलन/ जळगाव जामोद**

जळगाव जामोद शहरातील २५ वर्षीय तरुणीला शेगाव येथे आणत तिच्यावर लॉजमध्ये अत्याचार केल्याची घटना उघड झाली आहे. याप्रकरणी शहर पोलिसांनी आरोपी तरुणावर गुन्हा दाखल केला आहे. जळगाव जामोद शहरातील एका तरुणीस सुनगाव येथील प्रवीण प्रल्हाद दामधर याने काही महिन्यांपूर्वी शेगाव येथे आणले होते. तिला एका लॉजवर नेत बळजबरीने तिच्यावर अत्याचार केला. तसेच ही घटना कुणाला सांगितली तर जिवे मारून टाकण्याची धमकी दिली. याबाबत पीडित तरुणीने अनेक महिन्यानंतर शेगाव शहर पोलिस स्टेशनला तक्रार दिली. यावरून पोलिसांनी प्रवीण प्रल्हाद दामधर याच्याविरुद्ध भादंवि ३७६, ५०६ नुसार गुन्हा दाखल केला.

# ६ देशी पिस्टल जप्त, १ अटकेत शस्त्र माफियांचा टुनकी परिसरात वावर

**जनसंचलन/मेहकर**

मेहकर महाराष्ट्र मध्यप्रदेश सिमारेषेवर सातपुड्याच्या पायथ्याशी सोनाळा पोलीस स्टेशन आहे. टुनकी परिसरात एमपीतील शस्त्र बिनबोभाट सुरुच आहे. याला लगाम माफियांचा वापर बसण्या ऐवजी शस्त्र माफीयांचा खुलेआम वावर वाढला आहे. सोनाळा पोलीसांनी एका युवकाला पिस्टलसह रंगेहात पकडले आहे. यामुळे सातपुडा हादरला आहे. परिसरात यामुळे माजली आहे. या कार्यवाही बाबत ६ देशी पुन्हा एकदा एकच खळबळ पोलीसांनी मोठी गोपनीयता ठेवत प्रसार माध्यमांना माहिती देण्यास नकार दिला आहे. तर याबाबत दुजोरा मात्र दिला आहे. ही जॉबाज कार्यवाही शुक्रवार २२ फेब्रुवारीच्या संध्याकाळी ७ वाजे दरम्यान केदार नदीच्या पुलावर करण्यात आली आहे. याबाबत अधिक सोनाळा पोस्टे चे प्रभारी ठाणेदार सपोनि टूनकी येथे माहिती देण्यास चंद्रकांत पाटील यांनी नकार दिला. कॉल पण स्विकारले नाही. तर जिल्हा पोलीस अधिक्षक हे या बाबत माहिती देणार सोनाळा पोलीसांचे म्हणणे आहे. दरम्यान असल्याचे एक आरोपी अटक करण्यात आला आहे. तो पायदळ येत गुप्त माहितीच्या आधारे ही कार्यवाही असतांना करण्यात आली. बहुतांश वेळाआरोपी हे एमपीतून येवून शांतप्रिय भाग २२ असलेल्या टुनकी परिसराला बदनाम करित अवैध शस्त्र तस्कारी कारत आहेत. यामुळे परिसरातील नागरिक सतत दहशती खाली आहेत. सोनाळा पोलीस स्टेशन हे आंतरराज्य सिमेवर असतांना सीग्रेड पोलीस स्टेशन आहे. येथे पोलीस कर्मचारी संख्या अत्यंत कमी आहे. बहुतांश वेळा होमगार्ड येथे मोठ्या संख्येने सेवा देतात. तर पाहिजे त्याप्रमाणात स्थानिक कमी संख्याबळ व गुप्त खबर मिळत नसल्याने पोलीस सतर्क नसतात. टूनकी परिसरात अवैध शस्त्र माफीयांचा वावर वाढला असतांना येथे २४ तास पोलीसांची निगरानी हवी आहे.

# चिडीमार युवकाला युवतीने दिला बेदम चोप...

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

येथील बसस्थानकावर एका युवकाने एका युवतीकडे बघून छेडछाड केल्याचा प्रकार शुक्रवारी घडला. हा प्रकार त्या युवकाला चांगलाच महागात पडला. त्या युवतीने थेट युवकाजवळ जाऊन त्याला चांगलाच चोप दिल्याने त्याने या ठिकाणाहून धूम ठोकली. साखरखेर्डा येथील बसस्थानकावर २३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता मेहकर ते साखरखेर्डा बस आली. त्या बसमध्ये ५० हून अधिक प्रवासी उतरले. मेहकर येथून बसलेल्या तीन महिला व एक युवतीही साखरखेर्डा बसस्थानकावर उतरल्या. पुढील प्रवासासाठी बसची प्रतीक्षा करत एका ठिकाणी बसल्या. त्याच बसमधून एक पिवळ्या रंगाचा शर्ट घातलेला युवकही उतरला. बसमध्ये प्रवास करीत असताना त्या मुलीकडे बघून खाणाखुणा करीत होता. परंतु, त्या मलीने दर्लक्ष केले बसस्थानकावर उतरल्यानंतरही तो युवक इशारे करीत होता. अखेर महिलांच्या हा प्रकार लक्षात आला. त्यांनी व युवतीने सरळ त्या युवकाच्या जवळ जाऊन चोप दिला. हा प्रकार पाहून इतर प्रवाशांचे लक्ष त्याकडे गेले. तेव्हा त्या युवकाने लागलीच धूम ठोकली. काहींनी त्याचा पाठलाग केला. परंतु आता आपली खैर नाही हे पाहून त्याने मागे वळूनसुद्धा पाहिले नाही. साखरखेर्डा बसस्थानकावर दररोज शेकडो प्रवासी प्रवास करण्यासाठी येतात. शाळेतील मुलीही असतात. बसस्थानकावर मोकाट फिरणाऱ्या काही रोडरोमिओंची संख्या वाढली असून अशा रोडरोमिओंवर कारवाई करण्याची गरज आहे. साखरखेर्डा टाऊनमध्ये दोन बिट जमादार असताना पोलिस चौकीत एकही बिट जमादार आढळून येत नाही. ठाणेदार स्वप्निल नाईक यांनी या बाबीकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# २० हजार रुपयाची लाच मागणारे शेगाव पालिकेचे दोन कंत्राटी कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात...

**जनसंचलन/ शेगाव**

पंतप्रधान आवास योजनेतील घरकुलाचा धनादेश मिळण्यासाठी लाभार्थ्याला २० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या शेगाव नगर परिषदेतील दोन कंत्राटी कर्मचाऱ्यांना बुलढाणा लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या पथकाने रंगेहात पकडल्याची कारवाई २३ फेब्रुवारी रोजी दुपारी शेगाव- जानोरी मार्गावरील राजेश्वर कॉलनीजवळच्या रस्त्यावर घडली. शेगाव नगरपालिकेतील पंतप्रधान आवास योजनेच्या कार्यालयात आकाश भोज व संदेश पोहरकार हे दोघेही कंत्राटी पद्धतीने कर्तव्यावर आहेत. शहरातील एका लाभार्थ्याला पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाचे धनादेश मिळण्यासाठी त्याने सातत्याने पाठपुरावा केला. धनादेश काढण्यास कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून विविध कारणे देत टाळाटाळ सुरू होती. त्या दोन्ही कंत्राटी कर्मचाऱ्यांनी लाभार्थ्याला धनादेश मिळण्यासाठी २० हजार रुपये लाचेची मागणी केली. लाभार्थ्याने थेट बुलढाणा लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून २३ फेब्रुवारी रोजी विभागाच्या पथकाने दुपारी सापळा रचला. यावेळी ठरलेल्या ठिकाणी आकाश भोज व संदेश पोहरकार या दोन्ही कंत्राटी कर्मचाऱ्यांना लाच घेताना रंगेहात पकडले.



शिवसेनेचे मुख्यमंत्री असतांना मनोहर जोशी यांनी बुलढाणा येथील शिवसेनेचे आमदार असलेले विजयराज शिंदे यांच्या एका कार्यक्रमात त्यांची उपस्थिती लावली होती...

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958